प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक २२/२०१८ दिनांक १६/०३/२०१८ कालावधी ५ दिवस


| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ९४२२०६५३४४ |


**मागील हवामान सारांश**
**दि. १२/०३/२०१८ ते १६/०३/२०१८**

| | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (१७/०३/२०१८ सकाळी ८:३० पासून २१/०३/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| हवामानांचे घटक | : | १७/०३ | १८/०३ | १९/०३ | २०/०३ | २१/०३ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३३ | ३३ | ३३ | ३२ | ३१ |
| किमान तापमान (अं.से) | : | २४ | २४ | २४ | २३ | २२ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | २ | ० | १ | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६७ | ६८ | ७३ | ६७ | ७४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५५ | ५६ | ५५ | ५१ | ५० |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००४ | ०५ | ००४ | ००६ | ००७ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १७ व १९ मार्च, २०१८ अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक १७ ते २१ मार्च, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ७ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | रोपाअवस्था | • रब्बी–उन्हाळी भात पिकातील तणाचे व्यवस्थापन करावे आणि तसेच हंगामात भात पीकाची पुर्न:लागण करून १ महिना झालेल्या भात शेतीस ५५ किलो युरीया प्रती हेक्टर पहिला हप्ता द्यावा. |
| **कडधान्य पिके** | **वाढीची अवस्था** | • तयार झालेल्या कडधान्य पिकांची सकाळी आणि संध्याकाळी काढणी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. वाळलेली पिकांची संरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| **आंबा, काजू** | **वाढीची अवस्था** | • तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळधारणा झालेल्या आंब्याच्या झाडास १५० ते २०० लि. पाण्याच्या दोन पाळया १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुध्याभोवती अच्छादनाचा वापर करावा.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे गोटी व अंडाकृती असताना १ टक्का युरीया आणि १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची तीन वेळा फवारणी करावी.<br>• आंबा फळांचे तापमानापासून, तसेच कमी प्रमाणात पडणाऱ्या पावसापासून तसेच फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी डागरहीत आंबा फळांना कागदी/वर्तमानपत्रापासुन बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे.<br>• दि. १५ व १६ मार्च, २०१८ रोजी झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे करपा रोग येण्याची शक्यता आहे. त्यामुळे करपा रोगाच्या नियंत्रणासाठी आंबा पिकावर थायोफिनेट मिथाईल १ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १ ग्रॅम प्रती लिटर किंवा प्रोपीनेब २ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझिम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम पैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• फळधारणा झालेल्या आंबा झाडावरील मोहोर झाडून घ्यावा जेणेकरून करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी होईल.<br>• आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी डायमेथॉएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक फळमाशी सापळे लावावेत.<br>• काजू पिकावर ढेकण्याचा (टी मॉस्किटो) प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच करपा रोगाच्या नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथाईल १ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १ ग्रॅम प्रती लिटर किंवा प्रोपीनेब २ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारावे. (सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.) |
| **नारळ/ सुपारी** | — | • नारळ आणि सुपारीच्या बागांमध्ये अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण आणि हवेतील वाढलेली आर्द्रता यामुळे फळगळ या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्याच्या नियंत्रणासाठी नारळ आणि सुपारीच्या घडांवर १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरेथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• सुपारीवर येणाऱ्या कोळेरोग (सुपारीची गळ) या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी किंवा फॉसिटील ए. एल. ०.३ टक्के (१० लिटर पाण्यात ३० ग्रॅम) अधिक युरिया सुफला युक्त १११ गोळया किंवा फॉसिटील ए. एल. ०.३ टक्के (१० लिटर पाण्यात ३० ग्रॅम) अधिक कोकण अन्नपूर्णायुक्त ७६ गोळया प्रती झाडास द्याव्या. |
| **भाजीपाला लागवड** | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडुपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |